॥श्री॥

॥श्री॥

3 January 13

# उपनिषद अभ्यास

## - केनोपनिषद -

### शांतिपाठ

ॐ सहनाववतु । सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै ।
तेजस्वि नावधीतमस्तु । मा विद्विषावहै ॥
ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

अन्वय - ॐ नौ सह अवतु । नौ सह भुनक्तु । सह वीर्यं करवावहै । नौ अधीतं तेजस्वि अस्तु । मा विद्विषावहै ।
ॐ शांतिः शांतिः शांतिः ।

अर्थ - ॐ प्रणव, ब्रह्मनिदर्शक शब्द त्या सर्वश्रेष्ठ शक्तीला, परब्रह्माला ही प्रार्थना.
आमचे रक्षण करो, आमचे पालनपोषण करो. आम्ही ज्ञानाची नवनवीन क्षेत्रे पादाक्रांत करावीत. आमचे केलेले सर्व अध्ययन तेजस्वी राहो. आम्ही परस्परांचा द्वेष न करावा.

विवरण - ही प्रार्थना त्या निर्गुण, निराकार सच्चिदानंदघन सर्वशक्तीमान परमेश्वराला उद्देशून केलेली आहे. त्या परमशक्तीने आमचे रक्षण करावे. ही प्रार्थना गुरु व शिष्य या दोघांनी मिळून केली आहे म्हणून इथे 'नौ' हे द्विवचनी सर्वनाम आणि द्विवचनी क्रियापदे आली आहेत.

रानावनात राहणाऱ्या या आचार्य व शिष्यांना कुणाचे संरक्षण आहे! हिंस्र श्वापदांपासून, राक्षसांपासून, नैसर्गिक आपत्तींपासून, परकीय आक्रमणांपासून,

© www.madhuraveeraghuveer.com

Priority

January 2010

| M | T | W | T | F | S | S |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

8 am चोर-डाकू इ० त्या त्रासापासून त्यांचे रक्षण कोण
करणार? त्या सर्वशक्तिमान परमेश्वरावर भरोसा
9 ठेवूनच त्यांना रहायला पाहिजे म्हणून सर्वतोपरी
तोच आमचे रक्षण करो ही प्रार्थना केली आहे.
10 आणि अडचणी या केवळ बाहेरूनच येत नाहीत
तर आमची विषयासक्ती, सुखलोलुपता, आळस इ०
11 आमच्या उपासनेच्या आड येतात. त्यापासून ही तो
परमशक्तीच आमचे रक्षण करो व आम्हाला श्रेयसाच्या
12 मार्गावर ठेवो ही प्रार्थना!
आम्ही जे शास्त्र, विद्या अभ्यासणार आहोत ते
1 pm अध्ययन, उपासना, चिंतन मनन कधी होणार आहे?
आम्ही निश्चिंत आणि कार्यक्षम असू तेव्हाच हे शक्य आहे.
2 तेव्हा त्या परमेश्वरानेच आमचे पालनपोषण करावे.
त्यासाठी जमीन सुपीक असू दे. पाऊस योग्य तेवढा आणि
3 वेळेवर पडू दे. शरीरधारणासाठी आवश्यक ती अनुकूलता
परमेश्वराने द्यावी.
4 आम्हाला हा जो मनुष्यजन्म मिळाला आहे त्याचा
योग्य तो उपयोग करून घ्यायचा आहे. पशु आणि मनुष्य
5 यात जे अंतर आहे ते वाढवत न्यायचे आहे. माणसातील
पशुत्वाशी आमचा संघर्ष आहे. आम्हाला पशुतुल्य जीवन
6 जगायचे नाही. या दुर्लभ नरदेहाचे सार्थक करायचे आहे
त्या परमेश्वराप्रत जायचे आहे. त्यासाठी शिष्यांना व
7 आचार्यांना शक्ती दे. सामर्थ्य दे.
अशा रीतीने आम्ही जे अध्ययन करू ते
तेजस्वी असू दे. आमची बुद्धी तेजस्वी असू दे.
त्या तेजाला समजण्याचे सामर्थ्य बुद्धीला प्राप्त होऊ
दे. ब्रह्माचे तेज वर्चस आम्हाला प्राप्त होवो. त्या
तेजस्वी अध्ययनाने आम्हाला त्या परब्रह्माचा अनुभव येवो.

Birthday / Anniversary

©www.madhavveeraghuveer.com

February 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

*Priority*

TUE JAN 2010 5

Wk 01, 005-360

या मार्गात आम्ही कुणाचाही द्वेष करू नये. एखादा
8 am
शिष्य उपासना मार्गात पुढे गेला, कुणाची चटकन प्रगती
झाली, विशेष अनुभव आला, तरी त्याबद्दल असूया नको.
9
आचार्यांच्या मनातही सर्व शिष्यांबद्दल प्रेमभाव असू दे.
गुरु कृपाळू असतात. आपला आवाका, आपली शक्ती,
10
आपली बौद्धिक कुवत आपला स्वभाव या सर्वांचा विचार
करून ते उपदेश करतात. हा विचार मनामध्ये दृढ केला
11
म्हणजे हेवेदावे, भांडणे होणार नाहीत. श्रीकृष्णाने अर्जुनाला
उठून लढायला सांगितले, पण उद्धवाला हिमालयात जाऊन तप
12
करायला सांगितले. सर्वांनी एकत्र प्रेमाने राहून सर्वांचा
विकास साधायचा आहे. समजूतदार व्हायचे आहे.
1 pm
शिष्यांनी जसे आपापसात सामंजस्य दाखवायचे आहे
तसेच गुरु-शिष्यांचे नातेही विलक्षण असते. आचार्य जरी
2
आपल्या शिष्याला भरभरून देत असले आणि शिष्याच्या
मनात जरी आदरभाव असला तरी गुरूची एखादी सवय,
3
लकब किंवा स्वभावदोष असू शकतो. आणि त्याबद्दल
शिष्याच्या मनात खेद किंवा असंतोष उत्पन्न होऊ शकतो.
4
आचार्यांविषयी अनादर किंवा नाराजीची भावना निर्माण होते.
किंवा याच्या उलट शिष्य जर गुरूपेक्षा वरचढ ठरला तर
5
गुरूचा अहंकार वर चढतो आणि तो शिष्याला कमी लेखू
लागतो. अपमानास्पद वागणूक देऊ लागतो. असे काहीही
6
घडू शकते. मात्र आमच्या बाबतीत असे काहीही होऊ नये.
आमच्यात परस्परांविषयी द्वेषभाव नसावा. आमचे
7
संबंध स्नेहाचे, आदराचे, सौहार्दाचे असावेत.
हे देवा आमचे आध्यात्मिक, आधिभौतिक व
आधिदैविक अशा त्रिविध तापांपासून रक्षण होवो
प्रत्येकाचा योग्य विकास होत जावो.

—x—

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

## - शांतिपाठ -

ॐ आप्यायन्तु ममाङ्गानि वाक् प्राणश्चक्षुः श्रोत्रम्, अथो बलम्, इन्द्रियाणि च सर्वाणि, सर्वं ब्रह्मोपनिषदं, माहं ब्रह्म निराकुर्याम्, मा मा ब्रह्म निराकरोत्, अनिराकरणमस्तु, अनिराकरणं मे अस्तु, तदात्मनि निरते य उपनिषत्सु धर्माः, ते मयि सन्तु, ते मयि सन्तु ॥

ॐ शांतिः शांतिः शांतिः ॥

अन्वय - ॐ मम अङ्गानि वाक् प्राणः चक्षुः श्रोत्रम् च सर्वाणि इन्द्रियाणि अथो बलम् आप्यायन्तु। सर्वं औपनिषदम् ब्रह्म। अहं ब्रह्म मा निराकुर्याम्। ब्रह्म मा मा निराकरोत्। अनिराकरणं अस्तु। मे अनिराकरणम् अस्तु। उपनिषत्सु ये धर्माः ते आत्मनि निरते मयि सन्तु, ते मयि सन्तु।

ॐ शांतिः शांतिः शांतिः।

अर्थ - ॐ प्रणव ब्रह्मनिदर्शक शब्द. हे परब्रह्म, माझी सर्व अंगे - वाणी, प्राण, डोळे, कान - सर्वच इंद्रिये व त्यांचे सामर्थ्य पुष्ट होवो, वाढो. उपनिषदातून त्या ब्रह्माचे सर्व वर्णन आले आहे. (ते ब्रह्म सर्वत्र भरलेले असले तरी दिसत नाही म्हणून) मी ब्रह्माचा अस्वीकार न करावा. त्या ब्रह्मानेही माझा स्वीकार करावा. दोघांनी परस्परांचा स्वीकार करावा. आमचा संबंध कायम रहावा. आत्म्यामध्ये मी रत झालेलो आहे (ब्रह्माचा मला ध्यास लागला आहे. अशा माझ्यामध्ये उपनिषदात वर्णन केलेले सर्व गुण येवोत. ते धर्म माझ्यात येवोत. आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक शांति प्राप्त होवो.

© www.madhavveeraghuveer.com

February 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

*Priority*

THU JAN 2010 **7**

Wk 01, 007-358

8 am विवरण - ॐ प्रणव हा परब्रह्माचा द्योतक आहे. परब्रह्म
निर्गुण, निराकार, अनंत, नेहमी असणारे, सत्,
9 ज्ञानरूप, आनंदरूप आहे. ते माझ्या इंद्रियांनी जाणता
येत नाही. ते अगोचर आहे. प्रथम ते ॐ या ध्वनीने
10 व्यक्त झाले. त्या ॐ च्या मार्फत त्या सर्वशक्तीमान
परब्रह्माला प्रार्थना आहे. माझे अंग- माझे अवयव पुष्ट
11 होवोत. धर्माची साधना करण्यासाठी धडधाकट शरीर
हवे. माझे सर्व अवयव कार्यक्षम असूदेत. माझी वाणी,
12 माझे प्राण, माझे डोळे व कान ही सर्व ज्ञानेंद्रिये पुष्ट
होवोत. मला शारीरिक, मानसिक, बौद्धिक बळ प्राप्त होवो.
1 pm ज्ञानप्राप्तीसाठी आवश्यक असणाऱ्या मुख्य मुख्य
इंद्रियांचा उल्लेख इथे केला असला तरी सर्वच इंद्रिये पुष्ट
2 हवीत. गुरुजवळ बसायचे झाले तर आसन सिद्ध हवे.
मणका ताठ हवा. मन तरतरीत हवे. एकाग्र हवे. जे
3 ऐकले त्याचे नीट आकलन व्हावे. ते माझ्या बुद्धीत
स्थिर व्हावे. गुरुची सेवा करण्यासाठी सक्षम शरीर
4 समर्थ व लवचिक असावे.

सर्वं खल्विदं ब्रह्म। उपनिषदांनी ज्या ब्रह्माचे
5 वर्णन केले आहे तेच ब्रह्म सर्वत्र भरून राहिलेले आहे.
त्या ब्रह्माला उपनिषदांच्या माध्यमातूनच जाणता येते
6 यावर माझी श्रद्धा असावी. त्या परब्रह्माला मी दूर न
लोटावे. म्हणजे बाह्य आवरणाला महत्त्व न देता मी
7 आतील चैतन्याकडे लक्ष द्यावे. या जगाचा स्वीकार मी
ब्रह्मरूपाने करावा. त्या ब्रह्मानेही मला दूर लोटू नये.
त्याच्या कृपेनेच मला त्याचे स्वरूप समजू शकेल.

मी कसा आहे? तर आत्मनि निरत असा आहे.
परब्रह्मामध्ये जो सदा रत आहे. ब्रह्मसाक्षात्काराचा ज्याला
ध्यास लागला आहे असा आहे. उपनिषदात वर्णन केलेले

Birthday / Anniversary धर्म माझ्यात येवोत.

© www.madhaveeraghuveer.com

Priority

| January 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

उपनिषदात असे सांगितले आहे की शिष्याने अत्यंत विनम्र भावाने गुरुजवळ यावे. त्यांना प्रसन्न करून घ्यावे. त्यांची सेवा करावी. त्यांना योग्य प्रश्न विचारून ज्ञान प्राप्त करून घ्यावे. त्यासाठी शुद्ध मन हवे. कुशाग्र बुद्धी हवी. श्रवण, मनन, निदिध्यास हवा. विद्याग्रहण करण्याच्या पात्रतेचे मला बनव.

गीतेतील ज्ञानकर्मसंन्यासयोग ह्या चौथ्या अध्यायातील ३४ वा श्लोक हेच सांगतो.

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।
उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥

ज्ञान मिळवण्यासाठी ज्ञानवंतांना शरण जावे आणि निष्कपट भावाने, जिज्ञासु वृत्तीने त्यांना सर्व बाजूंनी योग्य प्रश्न विचारावेत. मात्र विनम्र वृत्ती आणि सेवाभावाने हे सर्व घडावे. तर ते ज्ञानी पुरुष शिष्याला भरभरून ज्ञान देतात.

त्रिविध तापांपासून मला शांति मिळू दे. शरीर, मन, बुद्धी शांत व स्थिर असल्याशिवाय श्रवण, ग्रहण, मनन आदि नीट होणार नाही.

प्रार्थनेमध्ये नम्रता हवी. ज्ञानप्राप्तीविषयी उत्सुकता हवी म्हणजे ईश्वरी कृपा होण्यास वेळ लागणार नाही.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

उपनिषदे प्रामुख्याने जीवनाचा समग्र विचार करतात. जीवनाचे प्रयोजन स्पष्ट करतात. त्यानुसार मार्गक्रमणा करता येते. यामध्ये संपूर्ण विश्व येते. विश्वातील परिपूर्ण मानव येतो. विश्वाच्या आद्यध्वनी ॐकार येतो. तो कसा जन्मला? त्याचे या विश्वात स्थान कोणते आहे याचा मूलभूत विचार उपनिषदात मांडला आहे. उपनिषदे अनेक असली तरी त्यातील प्रमुख ११ आहेत.

ईश, केन, कठ, प्रश्न, मुण्डक, माण्डूक्य

त्यापैकी आपण आता केनउपनिषद अभ्यासणार आहोत.

केन शब्दाने आरंभ होतो म्हणून केनोपनिषद. हे सामवेदाच्या तलवकार शाखेचे उपनिषद आहे. याचे चार खंड आहेत. पहिले दोन खंड पद्यात्मक असून त्यात शुद्ध आत्मस्वरूपाचे वर्णन आढळते. दुसरे दोन खंड गद्यात्मक असून त्यात ईश्वराचे स्वरूप, त्याची उपासना व शमदमादि साधने सांगितली आहेत. आत्मज्ञान हे मानवी जीवनाचे सर्वोच्च ध्येय आहे हे या उपनिषदात विशद केले आहे. यातील गुरु-शिष्याचा संवाद मनोहर आहे.

यातील शांतिपाठ व प्रार्थना हे मानस विरेचन आहे. प्रार्थना म्हणजे 'मी'पणाचे अर्पण. प्रार्थना ही मनाची संजीवनी आहे.

सुप्रभात हे प्रार्थनेचे आसन आहे. निवांत मन हे प्रार्थनेचे धूपदीप आहेत. ध्यान हा प्रार्थनेचा प्राण आहे. प्रसन्नता ही प्रार्थनेची आभरणे आहेत. सुंदर, पवित्र नितळ अंतःकरण हा प्रार्थनेचा गाभारा आहे. प्रसन्न लोक या देव गाभाऱ्यातून बाहेर येईल असे सामर्थ्य उपनिषदातील प्रार्थनेत आहे.

Birthday / Anniversary

©www.madhaveeraghuveer.com

*Priority*



8 am अध्ययन हा परमेश्वर आहे. यातून आपण सारे तेजोनिधि व्हायचे आहे. ही सद्भावना 'हे विश्वचि
9 माझे घर' चे स्मरण देणारी आहे. शांती म्हणजे सुशांतता! शांतिः म्हणजे अभ्यासातील प्रसन्नतेचा श्वास!
10 शांतिः म्हणजे अभ्यासासाठी समर्पित उच्छ्वास! यांनी मिळून जो असाधारण अबोल अनुभव
11 येतो त्याला ॐ शांतिः शांतिः शांतिः म्हणतात. कुठल्याही पूजेची, पठणाची, पारायणाची सांगता याने होते.
12 केनोपनिषदात शिष्यांनी फार महत्त्वाचे प्रश्न विचारले आहेत. ते असे — कोणाच्या इच्छेने प्रेरित
1 pm झालेले मन बाह्य वस्तूकडे धावते? कोणाच्या प्रेरणेने प्राण आपल्या धारणा राखतो? लोक जी वाणी बोलतात
2 त्याच्यामागे कुठले समर्थ असे मन असते का? डोळे आणि कान यांना कुठला देव आपापली कामे करायला
3 लावतो? प्रश्न नेमके आहेत. ते ऐकून गुरु प्रफुल्लित झाले आणि त्यांनी या सर्व प्रश्नांची उत्तरे
4 दिली. तेच हे केनोपनिषद! केन म्हणजे कोणी या शब्दापासून या उपनिषदाची सुरुवात झाली
5 म्हणून हे केनोपनिषद!
याला जैमिनीय उपनिषद, ब्राह्मणोपनिषद
6 असेही म्हणतात. या उपनिषदात गुरु-शिष्य संवाद आहे. तात्त्विक चर्चा पुष्कळ वेळा नीरसशी कळत नाही
7 पण दृष्टांतामुळे, गोष्टीमुळे मुद्दा पटकन व चांगल्या रीतीने कळतो. आपले गुरु हे किती कुशल शिक्षक
होते हे यावरून दिसून येते.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

प्रथम खंड

8 am ॐ केनेषितं पतति प्रेषितं मनः
केन प्राणः प्रथमः प्रैति युक्तः।
9 केनेषितां वाचमिमां वदन्ति
चक्षुः श्रोत्रं क उ देवो युनक्ति ॥१॥

10

अन्वय - केन इषितम् प्रेषितम् मनः पतति? केन युक्तः
11 प्रथमः प्राणः प्रैति? केन इषिताम् इमाम् वाचम्
वदन्ति? कः उ देवः चक्षुः श्रोत्रम् युनक्ति?

12

अर्थ - कोणाच्या इच्छेने प्रेरणेने मन (विषयात) पडते?
1 pm प्राणाला या शरीरात कोणी नियुक्त केले? व त्याला
अखंड चालायला कोणी सांगितले? या बोलणाऱ्या
2 वाणीला कुणी प्रेरित केले? हे डोळे हे कान यांना
कुठला देव, कुठली शक्ती (बघण्याच्या व ऐकण्याच्या
3 कामावर) नियुक्त करते?

विवेचन -

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| January 2010 | | | | | | |
| M | T | W | T | F | S | S |
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

8 am

श्रोत्रस्य श्रोत्रं मनसो मनो यद
वाचो ह वाचं स उ प्राणस्य प्राणः।
9
चक्षुचक्षुरतिमुच्य धीराः
प्रेत्यास्माल्लोकादमृता भवन्ति ॥ २ ॥

10

अन्वय - यत् मनसः मनः प्राणस्य प्राणः वाचः वाचं
11
चक्षुषः चक्षुः सः ह धीराः अतिमुच्य अस्मात्
लोकात् प्रेत्य अमृताः भवन्ति।

12

अर्थ - गुरु उत्तर देतात - जो कानाचा कान आहे,
1 pm
मनाचे मन आहे, वाणीची वाणी आहे. प्राणांचा
प्राण आहे. डोळ्यांचा डोळा आहे. शहाणे, ज्ञानी, धीर
2
या लोकातून जीवनमुक्त होऊन अमृत होतात.

3
विवेचन - ही सर्व ज्ञानेंद्रिये / कर्मेंद्रिये जड आहेत.
त्याकडून प्रेरित झाल्याशिवाय ती कार्य
4
करत नाहीत. मनाला प्राण प्रेरित करतो. पण प्राणांना
कोण प्रेरित करतो? ही सर्व इंद्रिये जड असली तरी
5
ती दगडाप्रमाणे नाहीत. त्यात चित्ताने प्रवेश केला की ती
कार्यरत होतात. मन बुद्धी ही सूक्ष्म आहेत पण ती
6
करणे च आहेत. ती ही जड आहेत. ती सुद्धा चितेच्या
शक्तीने कार्य करतात. ती चित म्हणजे खरे आपण
7
आपल्याला मिळालेल्या शक्तींच्या मुळापाशी पोचणे,
मूळ स्त्रोत समजून घेणे - अनुभवणे हे या मानवी जन्माचे
ध्येय आहे

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

न तत्र चक्षुर्गच्छति न वाग्गच्छति
नो मनो न विद्मो न विजानीमो
यथैतदनुशिष्यादन्यदेव तद्विदितादथो अविदितादधि ।
इति शुश्रुम पूर्वेषां ये नस्तद्व्याचचक्षिरे ॥३॥

अन्वय - तत्र न चक्षुः गच्छति न वाक् गच्छति नो मनः यथा एतत् अनुशिष्यात् न विद्मः न विजानीमः तत् विदितात् अन्यत् एव अथ अविदितात् अधि इति पूर्वेषां शुश्रुम ये नः तद् व्याचचक्षिरे ।

अर्थ - विदित - कार्य ; अविदित - कारण । Raw Material त्याच्यापर्यंत डोळे पोचू शकत नाहीत. वाणी पोचू शकत नाही. मन पोचू शकत नाही, त्याला बुद्धीने जाणता येत नाही. दुसऱ्याला त्याच्याबद्दल समजावून सांगता येत नाही (कारण) जाणलेल्या सर्व गोष्टींहून तो वेगळा आहे. न जाणलेल्या अज्ञात गोष्टींहूनही तो निराळा आहे. ज्यांनी त्या परब्रह्माचा साक्षात्कार घेतला त्यांच्याकडून आम्ही अशा तऱ्हेने ऐकले होते.

विवेचन - बॅटरीत घातलेल्या सेल्स मुळे दिवा लागतो व समोरचा रस्ता दिसतो पण त्या उजेडात ते सेल्स दिसत नाहीत. त्याप्रमाणे आपला डोळा बाहेर उघडणारा आहे त्याने बाहेरच्या वस्तू दिसतात पण डोळ्याच्या मागच्या गोष्टी दिसत नाहीत. म्हणूनच अध्यात्मात 'आवृत्तचक्षु' - डोळे आत वळवणे - याला महत्व आहे. परब्रह्म इंद्रियगोचर नाही. ते इंद्रियांच्या कक्षेबाहेरचे आहे. ते जाणण्यासाठी स्वतःच अथक प्रयत्न करावे लागतात. त्यासाठी गुरु मार्गदर्शन करतात खाणाखुणा सांगतात त्यांचा मागोवा घेत जो पुढे जातो त्याला तो अनुभव येतो.



© www.madhaveeraghuveer.com

4.Jan.2013

यद्वाचानभ्युदितं येन वागभ्युद्यते।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥४॥

अन्वय - यत् वाचा अनभ्युदितम् (अपि तु) येन वाक् अभ्युद्यते त्वं तत् एव ब्रह्म विद्धि इदम् यत् उपासते इदं न (तत् ब्रह्म)

अर्थ - जे वाणीद्वारा (शब्दांमध्ये वर्णन करून) सांगता येत नाही पण ज्याच्यामुळे ही वाणी बोलते-कार्य करते ते ब्रह्म आहे असे तू जाण. 'हे' म्हणून तू ज्याची उपासना करतोस ते ब्रह्म नव्हे. (हे म्हणजे इंद्रियगोचर असणारे)

विवेचन - नाभिस्थानापाशी वाणीचा उगम होतो. तिथे जे स्फुरण होते ती परावाणी! ती हृदयापर्यंत येते तिथे तिला पश्यन्ती म्हणतात. तिथे तिला अर्थ मिळतो. तिथून ती कंठात येते. स्वरयंत्रातून आल्यामुळे ती सकंप, नादयुक्त होते. तिला मध्यमा म्हणतात. मग कंठ, तालु, मूर्धा, दन्त, ओठ, नाक, जिह्वामूल आणि उर (हृदय) या आठ उच्चार स्थानांना स्पर्श करत वैखरी विविध वर्णातून अभिव्यक्त होते.

या सर्व प्रक्रियेला जी शक्ती कारणीभूत ठरते त्या शक्तीचे वर्णन वाणी करू शकत नाही कारण ती शक्ती त्या वाणीच्या उगमस्थानाच्या पाठीमागे आहे.

'हे' म्हणून जे दाखवता येते ते नामरूपात्मक आहे. उंची, रुंदी, खोली, दिक् आणि काल या पाच मितींनी ते मर्यादित आहे. ब्रह्म अमर्याद आहे त्यामुळे 'हे' म्हणून ज्याची उपासना होऊ शकते ते ब्रह्म नाही.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

येन मनसा न मनुते येनाहुर्मनो मतम् ।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥५॥

**अन्वय** – यत् मनसा न मनुते (अपि तु) येन मनः मतं आहुः तत् एव त्वं ब्रह्म विद्धि, इदम् यत् उपासते इदं न (ब्रह्म)

**अर्थ** – मनाने ज्याचे मनन करता येत नाही पण मन ज्याच्यामुळे मनन करु शकते ते ब्रह्म आहे असे तू जाण. 'हे' म्हणून तू ज्याची उपासना करतोस ते ब्रह्म नव्हे.

**विवेचन** – जी स्थिती वाणीची तीच मनाची. पण मन अधिक सूक्ष्म अधिक बलशाली आहे. मन हे वायुरूप आहे. ते अतिशय चंचल आहे. ते स्थिर रहात नाही. पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये या व्यतिरिक्त अकरावे इंद्रिय मन आहे. ज्ञानेंद्रिये गोळा करण्याचे काम करतात व मनाकडे आणून पोहोचवतात. मनच त्यांचे विश्लेषण करते; प्रिय-अप्रिय काय ते ठरवून त्याप्रमाणे कर्मेंद्रियांना आदेश देते. बुद्धि निश्चय करते. पण मन नेहमी बुद्धिचे ऐकतेच असे नाही. मन विषयांना चिकटून राहते. विषयांच्या आकर्षणामुळे मनाच्या विविध अवस्था होतात. इच्छा, संकल्प, संशय, श्रद्धा, अश्रद्धा, धृती, अधृती, लज्जा, बुद्धी, भीती या मनाच्या अवस्था आहेत. ह्या त्याच्या शक्तीप्रेरणे ते मन ब्रह्म जाणण्याचा प्रयत्न करते पण त्याला या शक्ती देणाऱ्या ब्रह्माला ते जाणू शकत नाही. जो ही शक्ती मनाला देते ते मनाच्या मागे आहे. ते ब्रह्म आहे. 'हे' म्हणून तू ज्याची उपासना करतोस ते ब्रह्म नव्हे.

Birthday / Anniversary

©www.madhaveeraghuveer.com

16 SAT JAN 2010

Wk 02, 016-349

Priority

चर्मचक्षुंना मर्यादा आहेत
विश्वरूप पाहण्यासाठी दिव्यचक्षु

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

January 2010

8 am
यच्चक्षुषा न पश्यति येन चक्षूंषि पश्यति।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते॥ ६॥

9

अन्वय - यत् चक्षुषा न पश्यति (अपि तु) येन चक्षूंषि पश्यति तत् एव त्वं ब्रह्म विद्धि। यत् 'इदम्' उपासते इदं न ब्रह्म।

10

11

अर्थ - ज्याला डोळे बघू शकत नाहीत पण ज्याच्यामुळे डोळ्यांना बघण्याची शक्ती प्राप्त होते ते ब्रह्म आहे असे तू जाण. 'हे' म्हणून ज्याची उपासना केली जाते ते ब्रह्म नव्हे.

12

1 pm

2

विवेचन - डोळे बाहेरचे जग पाहतात. त्यांना खूप दूरचे व खूप जवळचे दिसत नाही. मागचे तर मुळीच दिसत नाही. त्यामुळे या डोळ्यांना ज्यांनी बघण्याची शक्ती दिली त्याला हे डोळे पाहू शकत नाही. त्यांच्यामध्ये ती शक्ती नाही.

3

4

म्हणून तर भगवंतांनी दिव्य दृष्टी देईपर्यंत अर्जुनाला विश्वरूपदर्शन घेता आले नाही. कारण चर्मचक्षुंना मर्यादा आहेत.

5

6

साधक जर आवृत्तचक्षु झाला, जर त्याने आपली इंद्रिये आत वळवली तर त्याच्यामध्ये परमेश्वराचा अनुभव घेण्याची शक्ती येऊ शकते. पंचमहाभूतांनी निर्माण केलेल्या या इंद्रियांना मर्यादा आहेत.

7

त्यामुळे या दृष्टीला शक्ती देणाऱ्या त्याला तू ब्रह्म समज. तू 'हे' म्हणून ज्याची उपासना करतोस ते ब्रह्म नव्हे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

8 am

यच्छ्रोत्रेण न शृणोति येन श्रोत्रं इदं श्रुतम् ।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते ॥ ८ ॥

9

अन्वय - यत् श्रोत्रेण न शृणोति (अपि तु) येन इदम् श्रोत्रम् श्रुतम् तत् एव त्वम् ब्रह्म विद्धि ।

10

इदम् यत् उपासते, इदम् न ब्रह्म ।

11

अर्थ - जे कानांनी ऐकता येत नाही पण ज्याच्यामुळे कानांना ऐकण्याची शक्ती प्राप्त होते ते ब्रह्म आहे

12

हे म्हणून ज्याची उपासना करतोस ते ब्रह्म नव्हे.

1 pm

विवेचन - ॐ हे नादब्रह्म आहे. निर्गुण, निराकार, शुद्ध अनंत परब्रह्माच्या मनात अनेक रूपे घेण्याची

2

इच्छा झाल्यावर ॐ हा नाद अवतरला. निर्गुण, निराकार परब्रह्माचे ज्ञान करून घेण्याचे, अनुभवण्याचे द्वार ॐ

3

आहे. पण ॐ म्हणजे ब्रह्म नव्हे. ॐ च्या माथ्यावर पाय

4

देऊन साधकाला त्याच्याही पलीकडे जायचे आहे. उपासनेला आधार म्हणून ॐ घेतला जातो. पुढे तोही सोडायचा असतो.

5

त्यामुळे लक्षात ठेवायचे की जे कानांनी ऐकू येते, जे इंद्रियगोचर आहे ते ब्रह्म नाही. ब्रह्म त्याच्याही

6

पलीकडे आहे.

7

Birthday / Anniversary

©www.madhaveeraghuveer.com

8 am यत् प्राणेन न प्राणिती येन प्राणः प्रणीयते।
तदेव ब्रह्म त्वं विद्धि नेदं यदिदमुपासते॥८॥

9
अन्वय- यत् प्राणेन न प्राणिती (अपि तु) येन प्राणः
10 प्रणीयते तत् एव त्वम् ब्रह्म विद्धि। इदम्
यत् उपासते इदं न ब्रह्म।

11
अर्थ- प्राणांनी शक्ती पुरवल्यावर सर्व इंद्रिये कार्य करु
12 शकतात. ब्रह्म मात्र प्राणांनी प्रेरित करता येत
नाही तर ज्याच्यामुळे प्राण चैतन्ययुक्त होतात ते
1 pm ब्रह्म आहे असे तू जाण. 'हे' म्हणून तू ज्याची उपासना
करतोस ते ब्रह्म नाही.

2
विवेचन- आपल्या देहाचा विचार करता शुद्ध चैतन्य,
3 आत्मा याला आपण 'प्राण' म्हणतो. 'जीव' प्राण
हा अहं युक्त आत्मा त्यालाही आपण प्राण म्हणतो.
4 'जीव' प्राण देहात आहे हे ओळखण्याची खूण म्हणजे
श्वास चालू असणे. या श्वासोच्छ्वासाच्या योगे
5 माणूस जिवंत राहून त्याची सर्व इंद्रिये मन, बुद्धी
कार्य करतात यांना प्राणामुळे श[illegible] मिळते. पण ते
6 प्राण म्हणजे ब्रह्म नाही ज्याने चं[illegible]ल वायूला देहामध्ये
या कामावर नियुक्त केले ते [illegible] आहे. ज्याच्यामुळे
7 प्राणाला, जीवाला आपले काम करता येते ते ब्रह्म आहे
असे तू समज. 'हे' म्हणून ज्याची उपासना केली
जाते ते ब्रह्म नाही.
आईच्या पोटात असलेल्या बाळाला [illegible] ईकडून
सर्व काही मिळत असते ते ते सुरवात उ[illegible] पण ते
आपल्या आईचे नाव वय, रूप काहीही जाणू [illegible]कत नाही.



© www.madhaveeraghuveer.com

## - द्वितीय खंड -

8 am

यदि मन्यसे सुवेदेति दभ्रमेवापि नूनं त्वं वेत्थ ब्रह्मणो रूपम्।
9 यदस्य त्वं यदस्य च देवेष्वथ नु मीमांस्यमेव ते मन्ये विदितम्॥

10 अन्वय - यदि त्वं सुवेद इति मन्यसे अपि नूनं ब्रह्मणः रूपम् दभ्रम् एव वेत्थ। अस्य यत् त्वं, अस्य यत् देवेषु
11 (तत् अल्पम् एव) अथ नु मन्ये ते विदितम् (रूपम्) मीमांस्यम् एव।

12

अर्थ - (प्रथम खंडातील मंत्रातून गुरुंनी समजावल्यावर शिष्याचा चेहरा उजळला असावा.) गुरु म्हणतात.
1 pm अरे शिष्या, ब्रह्माचे स्वरूप मला चांगले कळले असे जर
2 तुला वाटत असेल तर तू ब्रह्माचे अगदी थोडेसेच रूप जाणले आहेस. जे तुला जाणल्याप्रमाणे वाटते आहे किंवा जे
3 प्रकाशयुक्त, द्योतनात्मक अवयवांमध्ये त्याचे रूप, त्याची शक्ती पाहतो आहेस, मला वाटते त्यावर चर्चा व्हायला
4 हवी. त्याची मीमांसा करायला हवी.

5 विवेचन - शिष्याचा गैरसमज गुरु दूर करत आहेत. मला कळले आहे असे जर वाटत असेल तर तुला
6 एक कणभरच ज्ञान झाले असावे कारण 'मला' शिक्षक आहे. ते इतके विशाल आहे की ते बुद्धीच्या आवाक्या
7 बाहेरचे आहे. तुला जे कळले असं वाटत आहे ती त्याची केवळ एक चुणूक आहे. ते अत्यल्प आहे. म्हणून
तुला जे काही कळले त्याची मीमांसा करायला हवी. तेव्हा तू आणखी मनन चिंतन कर.

दभ्र : दहराकाश, हृदयातील दोन जवनिकांमधील सूक्ष्म पोकळी.



© www.mazhaveeraghuveer.com

| January 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

नाहं मन्ये सुवेदेति नो न वेदेति वेद च।
यो नस्तद्वेद तद्वेद नो न वेदेति वेद च॥२॥

अन्वय - अहं सुवेद इति न मन्ये, नो न वेद वेद च इति। नः यः तत् वेद, तत् च वेद, वेद न वेद इति नो।

अर्थ - शिष्य म्हणाला- मला खूप चांगल्याप्रकारे कळले आहे असे काही मला वाटत नाही. पण मला काहीच कळले नाही असेही वाटत नाही. ते 'तत्त्व' मला मी ज्ञाता व ते ज्ञेय अशा रीतीने कळले नाही. बरं काहीच कळले नाही तर तसेही नाही. जो कोणी ब्रह्माला जाणतो तोच माझ्या या म्हणण्याचा अभिप्राय समजू शकेल. 'मी जाणतो' व 'मी जाणत नाही' असे दोन्हीही नाही.

विवेचन - जे कळले ते शब्दांनी व्यक्त करता येत नाही ही त्यातील न्यूनता आहे. अन्य पदार्थांना आपण जाणतो ते आपल्यापासून वेगळे असतात. त्यांना आपण जाणणे हा द्वैतातला व्यवहार आहे. पण स्वतःची व त्यावरून परब्रह्माची ओळख होणे हा द्वैताचा व्यवहार नाही. माझ्या खऱ्या स्वरूपावर जे पंचकोश चढले आहेत ते गळाल्यानंतर ते स्वयंप्रकाशी तत्त्व स्वसंवेद्य झाले. मी काहीही वेगळे जाणत नाही पण मला काहीतरी कळल्यासारखे वाटते आहे. म्हणून, कळले हो म्हणता येत नाही आणि कळले नाही असेही म्हणता येत नाही. काय आहे ते अभिव्यक्त करता येत नाही.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

यस्यामतं तस्य मतं मतं यस्य न वेद सः।
अविज्ञातं विजानतां विज्ञातमविजानताम् ॥३॥

अन्वय - अमतं तस्य मतं यस्य मतं सः न वेद।
विजानतां अविज्ञातम् अविजानतां विज्ञातम्।

अर्थ - जो म्हणतो मला ब्रह्म कळले नाही त्याला ते कळले आहे. जो म्हणतो मला ब्रह्म कळले आहे त्याला ते कळले नाही. जाणणाऱ्याला ते अज्ञात असते आणि न जाणणाऱ्याला ते ज्ञात असते.

विवेचन - जो म्हणतो की मला ब्रह्म कळले नाही त्याला ते कळले आहे व जो म्हणतो की मला ब्रह्म कळले आहे त्याला ते कळले नाही. मला कळले असे म्हणणाऱ्याचा 'मी' सुटला नाही. त्यामुळे ज्ञाता, ज्ञेय व ज्ञान ही त्रिपुटी शिल्लक आहे. परब्रह्म इंद्रियगोचर नाही. जेव्हा 'अहम्' गळून पडेल तेव्हा त्याला परब्रह्माचा अनुभव येईल. मात्र हा अनुभव आलेला सांगायला तो जागेवर नसणार. म्हणून तर त्याच्या अवस्थेचे वर्णन करताना मुक्याने गूळ खाल्ल्यावर त्याच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद एवढीच त्याची खूण. त्याला वाणीने काहीच सांगता येणार नाही.

सामान्य माणसही म्हणतो की 'मला ब्रह्म कळले नाही' पण इथे त्याचा विचार केलेला नाही. जो विवेकी आहे, मुमुक्षु आहे, ज्याने काही तपःसाधना करून ब्रह्म जाणण्याइतकी पात्रता प्राप्त केली आहे तो जेव्हा असे म्हणतो तेव्हा त्याला काही अर्थ आहे. त्याला वेद, उपनिषदे इ. च्या योगे परोक्षज्ञान आधीच झाले आहे.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

7 Jan. 2013

8 am प्रतिबोधविदितं मतंममृतत्वं हि विन्दते।
आत्मना विन्दते वीर्यं विद्यया विन्दतेऽमृतम्॥४॥

9 अन्वय - प्रतिबोधविदितं मतं हि अमृतत्वम् विन्दते।
10 आत्मना वीर्यम् विन्दते। विद्यया अमृतम् विन्दते॥

11 अर्थ - (एखादी गोष्ट आपल्याला नक्की कळली हे स्वतःला व इतरांना केव्हा कळेल? आपण ते व्यवस्थित
12 सांगू शकलो तर ते आपल्याला नक्की कळले असे होईल.) अशा रीतीने ज्याचा बोध होतो त्याचे ज्ञान होईल.
1 pm प्रचितीच्या माध्यमातून आत्म्याचे ज्ञान होईल. त्यालाच ते अमृतत्त्व प्राप्त होते आत्म्याला जाणल्यामुळे आत्मशक्तीने
2 सामर्थ्य प्राप्त होते व विद्येने- परा विद्येने, ब्रह्मविद्येने, आत्मविद्येने तो अमृतत्व प्राप्त करून घेतो (म्हणजेच
3 जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटतो.

4 विवेचन - अमृतत्व प्राप्त करून घ्यायचे असेल तर आत्म्याचे, परब्रह्माचे ज्ञान व्हायला हवे. म्हणजे त्याचा अनुभव,
5 संवेदना व बोध व्हायला हवा. असा बोध झाल्यावर पुन्हा जन्ममृत्यूच्या चक्रातून सुटता येते.

6 इंद्रिये व मन बुद्धी ज्याच्या शक्तीमुळे काम करतात त्या शक्तीचा ध्यास घेतला की ती शक्ती
7 अनुभवता येते, तिला जाणता येते. त्या आत्मशक्तीमुळे सामर्थ्य मिळते. परब्रह्माचा अनुभव घेण्यास सामर्थ्य हवे.

इंद्रिये स्वाभाविकपणे बाहेर धावतात. त्यांना आत वळवण्यासाठी खूप शक्ती, सामर्थ्य, पात्रता हवी. अशा पात्र झालेल्या मनाला, बुद्धीला परब्रह्माचा अनुभव येऊ शकतो. देहात असूनही ते जीवन्मुक्त होतात, आनंदाचे डोही आनंद

Birthday / Anniversary तरंग असा त्यांना अनुभव येतो.

© www.manaveeraghuveer.com

इह चेदवेदीदथ सत्यमासीन चेदिहावेदिन्महती विनाष्टिः।
भूतेषु भूतेषु विचित्य धीराः प्रेत्यास्माल्लोकादमृता भवन्ति ॥५॥

अन्वय - चेत् इह अवेदीत् अथ सत्यम् आसी, चेत् इह न अवेदीत् महती विनाष्टिः। धीराः भूतेषु भूतेषु विचित्य अस्मात् लोकात् प्रेत्य अमृताः भवन्ति।

अर्थ - हे (सत्य) जर इथे (या देहात असताना, मृत्युलोकीच) जाणले तर माणसाचे मोठे हित होईल. जर मनुष्यदेह मिळूनसुद्धा हे जाणून घेतले नाही तर मोठे नुकसान आहे. (जन्ममरणाचे चक्र) ज्ञानी लोक सर्व भूतमात्रांचा विचार करतात व या लोकातून गेल्यावर अमृत होतात (पुन्हा जन्माला येत नाहीत)

विवेचन - या जगात अनेक प्राणी आहेत. अनेक अचेतन वस्तुही आहेत. त्यापैकी परब्रह्माला जाणण्याची शक्ती केवळ मानवात आहे. अणु गतिशील आहेत पण त्यांना मानवासारखी बुद्धी नाही. झाडांना भावना, बुद्धी, शक्ती आहे पण ती तत्त्वज्ञान जाणू शकत नाहीत. अन्य प्राणीही परब्रह्माचा विचार करु शकत नाहीत. सूक्ष्मात जाऊन विचार करण्याची शक्ती, बुद्धी केवळ मानवाला दिली आहे. तपाने, साधनेने त्याला ती बुद्धी अधिक तीव्र, सूक्ष्म करता येते. मानवदेह ही उत्कृष्ट संधी आहे. जर आपण तिचा लाभ घेतला. परब्रह्माला जाणण्याचा अनुभव घेतला तर मनुष्यजन्माचे सार्थक होईल. मात्र ज्यांना हे उमगत नाही त्यांचा नाशच होतो. श्रुती या विनाशाबद्दल सावध करत आहे. मिळालेली संधी वाया घालवू नका. जे 'धीर' असतात ते बाह्य नाशवंत गोष्टींकडे पाठ फिरवू शकतात. परमेश्वरभेटीचा ध्यास घेतात.



© www.madhaveeraghuveer.com

## - तृतीय खण्ड -

ब्रह्म ह देवेभ्यो विजिग्ये तस्य ह ब्रह्मणो विजये देवा अमहीयन्त । त ऐक्षन्तास्माकमेवायं विजयोऽस्माकमेवायं महिमेति ॥१॥

**अन्वय** - ब्रह्म ह देवेभ्यः विजिग्ये ह तस्य ब्रह्मणः विजये देवाः अमहीयन्त । ते इति ऐक्षन्त अयम् अस्माकम् एव महिमा ।

**अर्थ** - (देव असुरांच्या युद्धात) ब्रह्मानेच देवांच्या मार्फत विजय प्राप्त केला परंतु परब्रह्माच्या विजयात देव आपलाच विजय बघू लागले त्यांना आपल्या कर्तृत्वाचा अहंकार वाटू लागला. त्यांना वाटले हा विजय खरोखर आमच्याच आहे. आमच्याच हा महिमा आहे.

**विवेचन** - पूर्वापार देवदानवांचे युद्ध सुरूच आहे. देव म्हणजे तेजस्वी, शौर्य, बुद्धी, शक्ती यांनी युक्त तर असुर हे स्वार्थी पापपुण्याची फिकीर न करणारे असतात. आजचा चंगळवाद हे त्याचेच प्रतीक आहे. अशा लोकांकडे शक्ती असते पण सद्बुद्धी नसते. चांगल्या वाईटांचे युद्ध पूर्वी सुद्धा झाले होते तेव्हा सर्व देव एकत्र आले त्यांनी निकराने झुंज दिली. देवांना विजय मिळाला पण विजयाच्या मस्तीत देव नम्रता विसरले वास्तविक पाहता देवांचे व विश्वाचे मूळ ब्रह्म म्हणून ब्रह्मच विजयी झाले होते. देवांना शक्ती पुरवून त्यांच्या मार्फत ब्रह्माने हे युद्ध जिंकले होते पण ब्रह्माच्या या विजयाबद्दल देवांना जाणीव राहिली नाही. आपणच महान आहोत या जाणिवेने ते सुखावले स्वतःच्या शक्तीचा त्यांना फार गर्व झाला. हा विजय केवळ आमच्याच प्रयत्नांनी मिळाला असे त्यांना वाटू लागले.

©www.mudraveeraghuveer.com

February 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

Priority

MON 25
JAN
2010
Wk 04, 025-340

8 am
तद्धैषां विजज्ञौ तेभ्यो ह प्रादुर्बभूव।
तन्न व्यजानत किमिदं यक्षमिति ॥२॥

9
अन्वय - ह तत् एषाम् विजज्ञौ। तेभ्यः ह प्रादुर्बभूव।
10 तत् इदम् यक्षम् किम् इति न व्यजानीत।

11 अर्थ - परब्रह्माने देवांचा हा (गर्व) जाणला. (त्यांचा गर्व नष्ट करण्यासाठी) ते परब्रह्म त्यांच्यासमोर
12 प्रकट झाले. देवांना हे समोर प्रकट झालेले यक्ष (गूढ आकार) काय आहे, कोण आहे हे कळले नाही.

1 pm
विवेचन - देव आपल्या शौर्याचे, शक्तीचे वर्णन करत होते. प्रत्येकजण स्वतःवरच खूश होत होता.
2 देव आपला विजयोत्सव साजरा करत होते. खाणे, सोमपान चालू होते. हे सर्व पाहून परब्रह्माने जाणले
3 की देवांना आपल्या शक्तीचा गर्व झाला आहे. ही
4 शक्ती कुणापासून मिळाली आहे याचा त्यांना विसर पडला आहे. त्यांना जाणीव करून द्यायला हवी की ही
5 जी त्यांच्यात शक्ती आहे ती मी दिल्यामुळे आहे.

एखादा खूप बुद्धिमान असतो, एखादा बलदंड
6 असतो, एखादा कलाकार असतो तर एखादा चतुर असतो हे गुण या शक्ती त्यांना कुणी दिल्या? एकाच
7 आईवडिलांची सगळी मुले सारखीच हुशार नसतात. समर्थांनी त्याचे उत्तर 'देणे ईश्वराचे' असे दिले आहे.
हे जाणून माणसाने नम्र व्हायला हवे. आपल्या गुणांचा गर्व करून इतरांना तुच्छ लेखू नये. माझ्यासाठी देवाने कोणते कार्य योजले आहे याचा विचार करून नम्रतेने ते कार्य करावे. परब्रह्म तिथेच त्या मांडवात

Birthday / Anniversary एका गूढ आकृतीच्या रुपाने प्रकट झाले.

©www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

तेऽग्निमब्रुवञ्जातवेद एतद् विजानीहि ।
किमिदं यक्षमिति, तथेति ॥३॥

अन्वय - ते (देवाः) अग्निम् अब्रुवन् "जातवेद एतद् विजानीहि इदम् यक्षम् किम् इति । तथा इति ।

अर्थ - ते देव अग्निला म्हणाले - "हे जातवेद, हे गूढ यक्ष काय आहे ते जाणून घे (व आम्हाला सांग) तेव्हा अग्नी ठीक आहे असे म्हणाला.

विवेचन - ते जे काही गूढ देवांना दिसले ते काय आहे हे देवांना समजले नाही पण काहीतरी महत्वाचे असणार एवढे मात्र त्यांनी ओळखले. नाहीतर ते देवांच्या मांडवात कशाला येईल? मग त्याला जाणून घेण्यासाठी तितकाच महत्वाचा कोणीतरी पाठवावा लागेल. असा महत्वपूर्ण देव कोण? तर अग्नी!

कारण या सृष्टीरचनेत प्रथम हिरण्यगर्भ निर्माण झाला. व त्यापासून सर्व ब्रह्मांड निर्माण झाले. प्रत्येक निर्मितीत ऊबही आवश्यक आहे. धान्याला मोड आणणे, दुधाला विरजण लावून दही बनणे या सर्वांसाठी ऊब आवश्यक आहे पृथ्वी उबदार आहे म्हणून धान्य देते. म्हणूनच अग्निला जातवेदस म्हणतात. जे जे जन्माला आले ते त्याच्याच सहाय्याने आले त्यामुळे तो प्रत्येक भूतमात्राला जाणतो. म्हणून तर देवांनी त्याला आपले मुख बनवले आहे. हा अग्नी सर्वांना जाणणारा आहे तेव्हा या गूढ आकृतीलाही तो जाणेल आणि ते नक्की काय आहे हे आपल्याला सांगेल अशी देवांना खात्री वाटली म्हणून त्यांनी हे महत्वाचे काम त्याला सांगितले. अग्निला इतके महत्व दिल्यामुळे तोही सुखावला व कामगिरीवर निघाला.



© www.madhaveeraghuveer.com

| February 2010 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| M | T | W | T | F | S | S |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

*Priority*

WED JAN 2010 **27**

Wk 04, 027-338

8 am

तदभ्यद्रवत् ,तमभ्यवदत् कोऽसीत्यग्निर्वा ।
अहमस्मीत्यब्रवीत् जातवेदा वा अहमस्मीति ॥४॥

9

अन्वय - तत् अभ्यद्रवत् तम् अभ्यवदत् कः असि? इति (सः) अब्रवीत् अहम् वै अग्निः अस्मि इति, अहम् वै जातवेदाः अस्मि इति।

10

11

अर्थ - ते (अग्नि) धावले. (पण त्यालाच यक्षाने प्रश्न केला) कोण आहेस तू? अग्नी म्हणाला -"मी अग्नी आहे. प्रसिद्ध जातवेद तो मीच".

12

1 pm

विवेचन - आता देवांनी एवढे सांगितले, एवढा मोठेपणा दिला तर असे जावे आणि विचारून यावे म्हणून अग्नी तिकडे त्या यक्षाच्या दिशेने धावला. स्वतःच्या घमेंडीने 'हा आता जाऊन येतो' असा भाव त्या 'अभ्यद्रवत' मुळे व्यक्त होतो. तिथे जाऊन त्या यक्षाला दरडावून विचारावे असा अग्नीचा बेत होता. पण त्या यक्षाच्या थोडे जवळ जाताच त्यानेच अग्नीला हटकले व विचारले - "कोण आहेस रे तू?"

2

3

4

5

अग्नीला आश्चर्य वाटते. हा मला ओळखत नाही म्हणजे काय? मी? मी तो सुप्रसिद्ध अग्नी! मीच जातवेद आहे. सगळे जग मला ओळखते. मी सगळ्या जगाला ओळखतो. जातं जातं वेत्ति इति जातवेदः। माझे महत्त्व सगळ्या जगाला ठाऊक आहे आणि तू मला जाणत नाहीस?

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

Priority

January 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

8 am
तस्मिंस्त्वयि किं वीर्यमिति।
अपीदं सर्वं दहेयम् यदिदं पृथिव्यामिति॥ ५॥

9
अन्वय - (सः अब्रवीत्) तस्मिन् त्वयि किं वीर्यम् इति।
10 अपि पृथिव्याम् यत् इदम्, इदम् सर्वं दहेयम् इति॥

11 अर्थ - बरं मग अग्नी नावाच्या तुझ्यामध्ये कसले
सामर्थ्य आहे? असं ते यक्ष म्हणाले. तेव्हा अग्नी
12 म्हणाला - (मनात आणलं तर) या पृथ्वीवर जे म्हणून
काही आहे ते सगळ्या सर्व मी जाळून टाकू शकतो.

1 pm
विवेचन - तेव्हा ते यक्ष म्हणाले - असं काय? तू ज्ञानवंत
2 आहेस तर! बरं मग मला असं सांग की अग्नी
नावाच्या तुझ्यामध्ये असं कोणतं सामर्थ्य आहे? तुझी
3 विशेष अशी शक्ती कोणती?
तेव्हा अग्नी म्हणाला - माझे सामर्थ्य? अरे
4 मनात आणलं तर ही पृथ्वीसुद्धा - या पृथ्वीवर जे
म्हणून काही आहे ते एका क्षणात जाळून टाकू शकतो

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

February 2010

| M | T | W | T | F | S | S |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

*Priority*

Stop



8 am तस्मै तृणं निदधावेतद्दहेति। तदुपप्रेयाय सर्वजवेन तन्न शशाक दग्धुं स तत एव निववृते। नैतदशकं विज्ञातुं यदेतद् यक्षमिति॥

9 अन्वय - (सः अब्रवीत) तस्मिन् त्वयि किं वीर्यम् इति।
10 अपि पृथिव्याम् यत् इदम् इदम् सर्वम् दहेयम् इति।

11 अर्थ - (ते यक्ष म्हणाले.) बरं मग अग्नी नावाच्या तुझ्यामध्ये कसले सामर्थ्य आहे? (अग्नी म्हणाला) -
12 (मनात आणले तर) या पृथ्वीवर जे म्हणून काही आहे ते सगळ्या सर्व मी जाळून टाकू शकतो.

1 pm ~~[illegible]~~ - अन्वय - तस्मै तृणम् निदधौ एतत् दह इति।
2 सः सर्वजवेन तत् उपप्रेयाय, तत् दग्धुं न शशाक। ततः निववृते। एतत् विज्ञातुम् न अशकम् - एतत्
3 यक्षम् यत् इति।

4 अर्थ - त्या यक्षाने त्या अग्निदेवाच्या समोर गवताचे पाते ठेवले व ते म्हणाले - हे जाळून दाखव. तेव्हा तो
5 अग्नी पूर्ण शक्तीनिशी त्याच्यावर तुटून पडला पण तो ते गवताचे पाते जाळू शकला नाही. म्हणून तो
6 तिथून मागे फिरला. (परत देवांकडे जाऊन म्हणाला) हे यक्ष काय आहे हे मी जाणू शकलो नाही.

7 विवेचन - अग्नीमध्ये जाळण्याची जी शक्ती आहे ती त्याची स्वतःची नाही. हे देणे ईश्वराचे आहे. ज्याने आपल्याला शक्ती दिली तो आत बसून अखंड शक्ती पुरवत असतो. आपल्याला आतले काही दिसत नाही आणि कुणाकडून मिळते हे काही कळत नाही. मानवाने हा विचार करायला

Birthday / Anniversary हवा हेच [illegible] यातून सुचवायचे आहे.

© www.madhaveeraghuveer.com

30 SAT JAN 2010

Wk 04, 030-335

Priority

January 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

अथ वायुमब्रुवन् वायवेतद् विजानीहि ।
किमेतद् यक्षमिति तथेति ॥७॥

अन्वय - अथ वायुम् अब्रुवन्, वायो एतत् विजानीहि किम् एतत् यक्षम् इति। तथा इति।

अर्थ - मग ते देव वायूला म्हणाले, वायो ते यक्ष काय आहे हे जाणून घे. बरं ठीक आहे असे वायू म्हणाला.

विवेचन - अग्नीला लज्जित होऊन आलेले पाहून देवांनी विचार केला की आता कुणाला पाठवावे? त्यांनी वायूला विनंती केली - अरे वायो हे काय यक्ष आहे ते तू जाणून घे.

वायुमध्ये प्रचंड शक्ती असते. प्राण्याला जसा श्वास तसा विश्वाला वायु महत्त्वाचा आहे. हा वायू सर्वत्र भरून राहिला आहे. आपले माहात्म्य ओळखून देवांनी आपली निवड केली ~~असा~~ असणार या विचाराने वायु प्रसन्न झाला व ऐटीत 'ठीक आहे' असे म्हणून निघाला.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

तदभ्यद्रवत् , तमभ्यवदत् कोऽसीति ।
वायुर्वा अहमस्मि इत्यब्रवीन्मातरिश्वा अहमस्मीति ॥८

अन्वय - तत् अभ्यद्रवत् । तम् अभ्यवदत कः असि इति । सः अब्रवीत अहम् वै वायुः अस्मि अहम् वै मातरिश्वा अस्मि इति ।

अर्थ - तो (त्या यक्षाकडे) धावला (ते यक्ष) त्याला म्हणाले - कोण रे तू ? वायु म्हणाला - मी वायू ! मी मातरिश्वा नावाने प्रसिद्ध आहे.

विवेचन - वायु झपाट्याने त्या यक्षाजवळ गेला आणि काही विचारणार इतक्यात त्या यक्षानेच त्याला विचारले - कोण रे तू ? तेव्हा वायू म्हणाला - अरे मीच तो प्रसिद्ध वायु. आणि मी मातरिश्वा या नावानेही प्रसिद्ध आहे.

मातरि म्हणजे अंतरिक्षात आणि श्वयन म्हणजे विचरण करणारा तो वायू ! म्हणजे संपूर्ण अंतरिक्षात भरून रहाणारा तो वायू, तो मातरिश्वा ! नुसते वायु एवढे नाव सांगून वायूचे समाधान झाले नाही तर आपले महत्त्व सांगणारे आपले खास नाव सांगून तो यक्षावर आपला प्रभाव पाडू पहात होता.

परब्रह्माने वायुचा हा अहंमन्यपणा जाणला आणि अग्निप्रमाणेच याचाही अहंकार घालवावा या हेतूने तो म्हणाला -

Birthday / Anniversary

February 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

8 am

तस्मिन्स्त्वयि किं वीर्यमिति? अपीदं सर्वमाददीयम्
यदिदं पृथिव्यामिति ॥ ९॥

9

अन्वय - तस्मिन् त्वयि किं वीर्यम् इति। अपि

10

पृथिव्याम् यत् इदम्, इदम् सर्वम् आददीयम् इति।

11

अर्थ - यक्ष म्हणाले - बरं मग वायु नावाच्या तुझ्यात काय सामर्थ्य आहे? वायु म्हणाला - या पृथ्वीवर

12

जे जे म्हणून काही आहे ते सर्व मी उडवून नेऊ शकतो.

1 pm

विवेचन - यक्षाने विचारले - सर्वव्यापी अशा तुझ्यात

2

अशी कोणती विशेष शक्ती आहे? तेव्हा वायु अहंकाराने म्हणाला - अरे जर मनात आले ना

3

तर या पृथ्वीवरच्या यच्चयावत गोष्टी मी उडवून लावीन. काय समजलास!

4

5

6

7

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

8 am तस्मै तृणं निदधावेतदादत्स्वेति।
तदुपप्रेयाय सर्वजवेन तन्न शशाकादातुं
9 स तत एव निववृते
नैतदशकं विज्ञातुं यदेतद् यक्षमिति॥१०॥

10 अन्वय - तस्मै तृणं निदधौ एतत् आदत्स्व इति। सः
11 सर्वजवेन तत् उपप्रेयाय (किन्तु) तत् आदातुम् न
एव शशाक। ततः निववृते एतत् विज्ञातुम् न अशकम्
12 इति, यत् एतत् यक्षम् इति।

1 pm अर्थ - (त्या यक्षाने) त्याच्यासमोर एक गवताचे पाते
ठेवले (व ते म्हणाले) हे उडव बरे! (वायू) त्यावर
2 (गवताच्या पात्यावर) सर्व वेगाने तुटून पडला पण
तो ते गवताचे पाते उडवू शकला नाही. मग तो
3 तिथून परत फिरला (व देवांना म्हणाला) ते यक्ष कोण
आहे हे काही मी जाणू शकत नाही.

4 विवेचन - उडवण्याची शक्ती वायूला परब्रह्माने दिली
5 होती ती त्याची स्वतःची नव्हती. तो आपल्या सर्व
शक्तीनिशी त्या गवताच्या पात्यावर तुटून पडला
6 पण काही उपयोग झाला नाही. शेवटी तो खाली
मान घालून तिथून माघारी वळला व देवांजवळ
7 येऊन म्हणाला ते यक्ष काय आहे ते काही मला
उलगडले नाही.



© www.madhaveeraghuveer.com

Priority इंद्र - २०० सूक्ते , स्वरूपवान [illegible]

[illegible] , [illegible] , [illegible]

[illegible] , [illegible] , [illegible]

[illegible] पुरंदर

[illegible] / पुत्र - [illegible]



8 am अथेन्द्रमब्रुवन मघवन्नेतद् विजानीहि किमेतद् यक्षमिति। तथेति तदभ्यद्रवत् । तस्मात् तिरोदधे ।। ११ ।।

9 अन्वय - अथ देवाः अब्रुवन्, मघवन् एतद् विजानीहि, 10 किम् एतद् यक्षम् इति । तथा इति । तेन अभ्यद्रवत् , तस्मात् तिरोदधे ।

11 अर्थ - मग (देव) इंद्राला म्हणाले - अहो देवराज, जा, ते 12 यक्ष काय आहे ते जाणून घ्या. (तो म्हणाला) बरं ! तो (यक्षाकडे) धावला. पण ते यक्ष त्याच्या 1 pm समोरून अदृश्य झाले.

2 विवेचन - जेव्हा अग्नी व वायु खाली मान घालून पराभूत होऊन आले तेव्हा देव इंद्राला म्हणाले - हे 3 मघवन् (बलशाली) ते यक्ष काय आहे ते जाणून घे. इंद्रानेही ठीक आहे म्हणून उत्तर दिले, व तो 4 यक्षाकडे निघाला. पण तिथे जाताच पहातो तो काय - ते यक्ष अंतर्धान पावले. तिथे आता काहीच नव्हते. 5 वास्तविक पहाता त्याला पाहून यक्ष पळून गेले असे वाटून त्याला गर्व व्हायला असता. पण इंद्र केवळ 6 बलशालीच नव्हता तर विचारीही होता. त्याला कळेना की आतापर्यंत दिसत असलेली आकृती गेली कुठे? 7 तो बेचैन झाला. त्या यक्षाला जाणून घेण्याची त्याला तीव्र आस लागली. त्याचे सत्यस्वरूप जाणावेसे वाटू लागले. एकदा का स्वतःचे क्षुद्रत्व समजले व परम ईश्वराला भेटण्याची ह्यास लागली की तो निश्चित कृपा करतोच. मात्र तितकी तळमळ हवी.

©www.madhavaeraghuveer.com

Birthday / Anniversary

स तस्मिन्नेवाकाशे स्त्रियमाजगाम बहुशोभमानामुमां हैमवतीं।
तां होवाच किमेतद्यक्षमिति॥ १२॥

अन्वय - सः तस्मिन् एव आकाशे बहुशोभमानां स्त्रियं हैमवतीं उमाम् आजगाम। तां ह उवाच (देवी) एतद् यक्षम् किम् इति।

अर्थ - मग इंद्राला (जिथे यक्ष होते तिथेच) त्या अवकाशात एक अत्यंत लावण्यसंपन्न स्त्री दिसली. त्या हिमालय कन्येजवळ - उमेजवळ तो (इंद्र) पोहोचला. त्याने तिला विचारले - "हे यक्ष कोण होते?"

विवेचन - ज्याच्यापुढे अग्नी व वायू हतप्रभ झाले ते गूढ यक्ष निश्चितच दिव्य व शक्तिशाली असणार. परंतु इंद्राला वाटले की निदान अग्नी व वायू इतके भाग्यवान की यक्ष त्यांच्याशी बोलले तरी! मी तर त्याला बोलण्याच्याही पात्रतेचा वाटलो नाही. या विचारांनी तो कासावीस झाला. यक्षाला जाणण्यासाठी व्याकुळ झाला. तिथेच उभा राहिला. अगदी शेवटपर्यंत इथून हलायचे नाही असा निर्धार त्याने केला.

इतक्यात एकदम प्रकाश पडला. इंद्राने समोर पाहिले जिथे ते यक्ष उभे होते तिथे एक सुंदर, दिव्य स्त्री उभी होती. ती साक्षात ब्रह्मविद्या होती. आत्मिक तेजाने तिचे वदन, अंग देदीप्यमान दिसत होते. ती अत्यंत लावण्यवती दिसत होती. तिच्या अंगावर आभूषणे झळकत होती. अशी ती सुंदर, तेजस्वी देवी शिवपत्नी उमादेवी होती. तिच्या नेत्रात वात्सल्य होते. इंद्राची व्याकुळता तिने जाणली. इंद्राने तिचे चरण धरले व ते यक्ष काय होते ते समजावून सांगण्याची तिला विनंती केली.

© www.madhaveeraghuveer.com

5 FRI FEB 2010

Wk 05, 036-329

Priority

चतुर्थ खण्ड (६३)

February 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

8 am सा ब्रह्मेति होवाच ब्रह्मणो वा एतद्विजये महीयध्वमिति।
ततो हैव विदाञ्चकार ब्रह्मेति ॥१॥

9 अन्वय- सा (देवी) ह उवाच "ब्रह्म" इति। "ब्रह्मणः वै
10 एतत् विजये महीयध्वम्" इति। ततः एव ह
विदाञ्चकार 'ब्रह्म' इति।

11 शब्दार्थ- ती (हिमकन्या उमा) म्हणाली- ते ब्रह्म होते।
12 ब्रह्माच्या विजयाला तुम्ही स्वतःचा मोठेपणा समजलात.
उमेचे बोलणे ऐकल्यावर इंद्राला निश्चितपणे कळले
1 pm की 'ते' यक्ष ब्रह्म होते.

2 विवेचन- ती देवी म्हणाली की अरे ते ब्रह्म होते. त्या
ब्रह्माने तुम्हाला शक्ती दिली म्हणून तुम्ही विजयी झालात.
3 तो विजय ब्रह्माचा विजय होता. पण त्या विजयाने
तुम्ही स्वतःला फार महान समजायला लागलात.
4 इंद्राचा अहंकार गेला होताच त्या दिव्य शक्ती-
विषयी अधिक जाणून घेण्याची त्याच्या मनात तीव्र
5 जिज्ञासा होती. तो ब्रह्मज्ञान प्राप्त करण्यास पात्र आहे
हे पाहून ~~देवीने~~ देवीने इंद्राला ब्रह्मविद्या दिली.
6 यावरून दोन गोष्टी स्पष्ट होतात. एकतर अनन्यभाव
मनात उत्पन्न होऊन शरणागत होणे आणि त्या शक्तिमानाच्या
7 शक्तीची आपल्याला थोडी तरी जाणीव होणे. त्याला जाणून
घेण्याचा ध्यास लागायला हवा. साधकाची ही स्थिती
झाली म्हणजे तो ब्रह्मविद्येचा अधिकारी झाला. पण
अधिकारी झाला तरी गुरुकृपेशिवाय ज्ञान शक्य नाही.

© www.madhaveeraghuveer.com

Birthday / Anniversary

March 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |

*Priority*

SAT FEB 6 2010

Wk 05, 037-328

8 am तस्माद्वा एते देवा अतितरामिवान्यान् देवान् यदग्निर्वायुरिन्द्रस्ते।
ह्येनन्नेदिष्ठं पस्पृशुस्ते ह्येनत् प्रथमो विदाञ्चकार ब्रह्मेति॥

9 अन्वय - तस्मात् वै एते देवाः यत् अग्निः वायुः इन्द्रः
10 अन्यान् देवान् अतितराम् इव हि एनत् नेदिष्ठम्
पस्पृशुः ते हि एनत् प्रथमः विदाञ्चकार ब्रह्म इति॥

11 अर्थ - त्यामुळे हे तीन देव- अग्नी, वायु व इंद्र हे
12 अन्य देवांपेक्षा (जणू काही) श्रेष्ठ आहेत. ह्याच
तिघांनी ब्रह्माला जवळून स्पर्श केला (नेत्राने, कानांनी)
1 pm याच देवांना प्रथम कळले की ते प्रगट झालेले
ब्रह्म होते

2 विवेचन - सगळ्या शास्त्रांचा जाणकार असला, परमाणूचे
3 ज्ञान असलेला, त्यांचा संपूर्ण हिशोब करणारा, बुद्धीवान
असला तरी जोपर्यंत अहंता आहे, तोपर्यंत कोटि जन्म
4 गेले तरी परब्रह्मापर्यंत पोचता येणार नाही. देवांना
आपली चूक कळून आली. त्यांच्या अहंकाराचा मद
5 उतरला. परब्रह्माने त्यांच्यावर कृपा केली. म्हणून हे
तिन्ही देव इतर देवांहून निश्चित श्रेष्ठ ठरले. त्यांचे
6 श्रेष्ठत्व कशात आहे? तर ते तिघे (अग्नी, वायू, इंद्र)
परब्रह्मापर्यंत पोहोचू शकले त्याला स्पर्श करू शकले
7 म्हणून ते श्रेष्ठ ठरले. त्यापैकी इंद्राला उमेच्या कृपेने
ब्रह्माचे स्वरूप कळू शकले. निश्चित ज्ञान हे केवळ
गुरुकृपेनेच होते. (इव - निश्चितपणे, निर्विवाद)

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

तस्माद्वा इन्द्रोऽतितरामिवान्यान् देवान् स ह्येनन्नेदिष्ठं पस्पर्श, स ह्येनत् प्रथमो विदाञ्चकार ब्रह्म इति॥

अन्वय- तस्मात् वै इन्द्रः अन्यान् देवान् अतितराम् इव हि सः एनत् नेदिष्ठम् पस्पर्श। स हि एनत् प्रथमः विदाञ्चकार ब्रह्म इति॥

अर्थ- म्हणून त्या अन्य देवांपेक्षा इंद्र श्रेष्ठ आहे. त्याने त्या (ब्रह्माला) जवळून स्पर्श केला. जाणले की हे ब्रह्म आहे.

विवेचन- इंद्र हा अग्नी व वायूपेक्षा श्रेष्ठ. कसा? खरं तर ते यक्ष अग्नी व वायुशी बोलले. इंद्राशी तर ते बोललेही नाही. पण त्यामुळेच इंद्राचा अहंकार दुखावला पण तो विचारी होता. त्याच्यामध्ये श्रेष्ठ गुण असल्यानेच तो राजा आहे. ते यक्ष अंतर्धान पावले. त्याच्याशी बोलले नाही. त्याला दिसले सुद्धा नाही. पण म्हणून त्याने चिकाटी सोडली नाही. तो परत न येता तिथेच थांबला. अतिशय आर्ततेने ते यक्षाचे रहस्य उलगडण्याची तो वाट पहात राहिला. त्याने त्यासाठी प्रार्थना केली आणि तो ब्रह्मविद्येचा पात्र ठरला. पात्रता मिळायलाच वेळ लागतो प्रत्यक्ष ज्ञान होण्यासाठी वेळ लागत नाही. इथे इंद्राने ती पात्रता प्राप्त केली होती म्हणून देवीने सांगताच त्याला बोध झाला. अग्नी व वायू ब्रह्माचे सगुण रूप पाहू शकले पण इंद्राला सगुण व निर्गुण दोन्हीचा लाभ झाला.
ब्रह्म इंद्रियातीत आहे. ती ऊर्जा, शक्ती आहे. ती दिसत नाही. कार्यावरुन केवळ जाणता येते. पण ती असतेच.
अग्नी व वायूला पराभूत करणारे यक्ष दिव्य, महान, शक्तिमान आहे ही श्रद्धा इंद्राच्या मनात होती. या श्रद्धेमुळे व जिज्ञासेमुळे आणि अहंपणा गेल्यामुळे त्याला मातेचे दर्शन झाले व ज्ञानप्राप्ती झाली.

© www.madhaveeraghuveer.com

तस्यैष आदेशो यदेतद् विद्युतो ।
व्यद्युतदा इतीन्न्यमीमिषदा इत्यधिदैवतम् ॥४॥

अन्वय - तस्य एष: आदेश: यत् एतत् विद्युत: व्यद्युतत् आ इति इत् न्यमीमिषत् आ इति अधिदैवतम् ।

अर्थ - म्हणून हा ब्रह्माचा आदेश आहे. वीज जशी लखकन चमकते व नाहीशी होते, डोळे जसे निमिषात उघडझाप करतात त्याप्रमाणे देवांना त्याचे दर्शन झाले, हा अधिदैविक उपदेश आहे.

विवेचन - ब्रह्मासंबंधी जो काही उपदेश उपनिषदात केला जातो त्याला आदेश म्हणतात. ब्रह्माची अधिभौतिक व अधिदैविक अशी रूपे आहेत. पंचमहाभूतासंबंधी जे काही आहे ते अधिभौतिक व तेजोमय द्युतियुक्त देवतांसंबंधी जे आहे ते अधिदैविक! परब्रह्म सर्वत्र भरून असल्याने आचार्य त्याची वेगवेगळी रूपे साधकांना समजावून सांगतात. यासाठी उपमा किंवा दृष्टांत वापरले आहेत. ब्रह्म हे सर्वत्र भरून राहिलेले असले तरी ते दिसत नाही आणि म्हणून आपला त्याच्यावर विश्वास बसत नाही. त्यासाठी हे ब्रह्म कधी कधी वीजेप्रमाणे क्षणमात्र चमकून आपले अस्तित्व जाणवून देते. वीज क्षणभरच चमकते व आसमंत उजळवून टाकते. लगेच लुप्त होते. मात्र हे रूप पाहिल्यावर साधकाला त्याचा ध्यास लागतो व त्याच्या प्राप्तीसाठी तो अधिक आर्ततेने, दृढनिश्चयाने साधना करू लागतो. इंद्राला हे अशा प्रकारचे रूप ब्रह्माने दाखवले. इंद्राला इंद्रियातीत, गूढ रूप - यानंतर ~~देवीच्या रूपाने~~ त्याचे अव्यक्त असपष्ट रूप आणि नंतर देवीच्या रूपाने त्याचे स्थूल रूप अशी तिन्ही रूपे पाहिली

Birthday / Anniversary

©www.madhaveeraghuveer.com

अथाध्यात्मं यदेतद्गच्छतीव च मनोऽनेन।
चैतदुपस्मरत्यभीक्ष्णं संकल्पः॥ ५॥

अन्वय - अथ अध्यात्मम् । यत् मनः एतत् (समीपं) गच्छति इव च एतत् अभीक्ष्णम् उपस्मरति अनेन सङ्कल्पः।

अर्थ - आता अध्यात्मिक स्वरूपाचा उपदेश। मन त्याच्याजवळ जाते. व त्याचे पुन्हा तीव्रतेने स्मरण करते. मनाने तो त्यांच्याजवळ जाण्याची इच्छा करतो.

विवेचन - आपण इकडून तिकडे जातो म्हणजे आपले शरीर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाते. ते सर्वांना दिसते. पण आपले मन हे 'गच्छति इव' जणू काही जाते. ते कोणालाच दिसत नाही.

आपण एखाद्या ठिकाणी (उदा० हिमालयात) मनाने जातो म्हणजे प्रत्यक्ष जात नाही तर त्याचे स्मरण करतो. त्या वस्तूचे स्मरण म्हणजे मनाने तिथे जाणे. आपले मन क्षणाक्षणाला त्याची तीव्रतेने आठवण काढते आणि मग त्याच्या भेटीचा संकल्प करत असते.

साधकाला जप करायला सांगतात. जप करणे म्हणजे मनाने त्या उपास्य देवतेच्या जवळ जाणे. असे वारंवार तिथे जाण्याने त्याचा ध्यास लागतो व मन त्याच्या भेटीची इच्छा करू लागते. ही इच्छा तीव्र झाली की उपास्य देवतेचे दर्शन घडते.

मात्र मनाला अशी ओढ लागण्यासाठी पुन्हा त्याचीच कृपा व्हावी लागते. मनाला चुचकारून या मार्गावर आणले की तेच मन आपल्याला त्याच्याकडे घेऊन जाते.

© www.madhaveeraghuveer.com

8 am तद्ध तद्वनं नाम तद्वनमित्युपासितव्यं स य एतदेवं वेदाभि हैनं सर्वाणि भूतानि संवाञ्छन्ति ॥ ६॥

9 अन्वय - तत् तद्वनम् नाम ह । तत वनम् इति उपासितव्यम् ।
10 सः यः एवम् वेद एनम् ह सर्वाणि भूतानि अभि संवाञ्छन्ति ॥

11 अर्थ - त्या ब्रह्माचे नाव आहे वनम् (वंदनीय, पूजनीय) त्या ब्रह्माची उपासना 'वन' म्हणून करावी. हे ज्याला
12 उमगले त्या त्याच्यावर या विश्वातील सर्व भूतमात्र मनापासून प्रेम करतात. सर्वांना तो हवाहवासा वाटतो.

1 pm विवेचन - दिसत नसले तरी असणारे ब्रह्म साधकाने
2 जाणून घ्यायचे असते त्या ब्रह्माचे आणखी एक प्रसिद्ध नाव म्हणजे 'तद्वन'! वन म्हणजे हवेहवेसे वाटणारे जे
3 सुखदायक आहे ते! ब्रह्म हे आनंदस्वरूप आहे त्यामुळे त्याच्या स्पर्श झाला तर साधकही आनंदस्वरूप होतो.

4 वास्तविक जगात सर्व आनंददायकच आहे. आपणच मी व माझे ची कुंपणे घालून दुःखे निर्माण करतो.
5 विश्व ही लीला आहे. खेळ कोणीही दुःखासाठी खेळत नाही. नाटक कोणी दुःखासाठी पहात नाही. आपण ही
6 हे जीवन खेळ समजून खेळलो, नाटक समजून तटस्थ आलिप्त राहून पाहिले तर त्याचा आनंद घेता येईल.
7 हीच ब्रह्माची उपासना!

जगण्यात आनंद आहे. मनसोक्त श्वास घेण्यात आनंद आहे. तहान लागल्यावर पाणी पिण्यात, भूक लागल्यावर अन्न सेवन करण्यात आनंद आहे. या आनंदाची जाणीव ठेवून जगलं तर साहजिकच हे सर्व देणाऱ्याची कृतज्ञ आठवण होत राहील. त्याचे नित्यस्मरण एक दिवस त्याचा साक्षात्कार घडवील.

Birthday / Anniversary

© www.madhaveeraghuveer.com

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

उपनिषदं भो ब्रूहीत्युक्ता त उपनिषद्।
ब्राह्मी वाव त उपनिषदब्रूमेति ॥ ७ ॥

अन्वय - (शिष्य) भो: उपनिषदं ब्रूहि। (गुरु) इति ते उपनिषत् उक्ता। ते वाव ब्राह्मी उपनिषदम् अब्रूम इति।

अर्थ - शिष्य प्रार्थना करतो अहो गुरुदेव ब्रह्माबद्दलचे गूढ ज्ञान मला सांगा. तेव्हा गुरु म्हणतात - अरे तुला ब्रह्माचेच गूढ ज्ञान सांगितले. तुला (आतापर्यंत जे सांगितले) ती ब्रह्मविद्याच खरोखर सांगितली.

विवेचन - गुरुंनी आतापर्यंत शिष्याला 'परब्रह्माचे गूढ ज्ञान' याविषयी विवेचन केले होते. तरीसुद्धा अधिक स्पष्टीकरण करण्यासाठी, भाग अधिक विशद करून सांगण्यासाठी शिष्य प्रश्न विचारतो आहे.

गुरूने सांगितलेल्या गोष्टींवर आता मनन करण्याची आवश्यकता आहे. श्रद्धेने निरंतर मनन करायला हवे. गुरूने जे जे सांगितले त्या प्रत्येक शब्दावर विचार करायला हवा.

उपनिषद म्हणजे ब्रह्माजवळ जाऊन तद्रूप होणे म्हणून ते साधनही आहे आणि साध्यही आहे.

संस्कृतमध्ये उपनिषद स्त्रीलिंगी आहे म्हणून ते उपनिषद उक्ता असे म्हटले आहे.

तस्यै तपो दमः कर्मेति प्रतिष्ठा।
वेदाः सर्वाङ्गानि सत्यमायतनम्॥८॥

अन्वय- तस्यै तपः दमः कर्म इति प्रतिष्ठा। वेदाः सर्वाङ्गानि सत्यम् आयतनम्।

अर्थ- त्या ब्रह्मविद्येचे तीन आधार आहेत. तप, इंद्रियदमन व कर्म. वेद त्या ब्रह्मविद्येचे संपूर्ण अंग आहे. त्या त्रिकालाबाधित सत्यस्वरुपाचे (ब्रह्माचे) राहण्याचे ठिकाण वेद आहे.

विवेचन- ब्रह्मविद्या प्राप्त करावयाची असेल तर त्यासाठी पात्रता अंगी आणायला हवी. ती पात्रता आणण्यासाठी तप करायला हवे. तप म्हणजे मन एकाग्र, स्थिर करणे. त्यासाठी इंद्रिये वश हवीत. म्हणजे इंद्रियदमन करायला हवे. शम म्हणजे मन शांत ठेवायला हवे. कर्म करायला हवे. निषिद्ध कर्म टाळून शास्त्रविहित कर्म करायला हवे. निग्रह करुन शास्त्रविहित कर्म केले म्हणजे ते कर्मच तपोरुप होते. या तीन गोष्टी ब्रह्मविद्येच्या प्रतिष्ठा आहेत.

त्या म्हणजेच ब्रह्मविद्येचा आधार। तप म्हणजे मन एकाग्र झाले की सत्य त्यात प्रकट होतेच. शरीर व मनाला शिस्त लागू लागते. इथूनच तपश्चर्येला सुरुवात होते.

ब्रह्मज्ञान प्राप्तीसाठी तप, दम, कर्म या तीन पायऱ्या चढून जाव्या लागतात. मग सत्याचा कळस दिसू लागतो. सत्य म्हणजे जे सदा-सर्वदा निरंतर असतेच.-ब्रह्म.

वेद व वेदांगे त्याच्याकडे जाण्यासाठी मार्गदर्शन करतात. वेदांत व वेदांच्या अंगात ते सत्य वास करते. हा देह माझा नाही. शक्ती माझ्या नाहीत. परब्रह्माने मला ते वापरायला दिले आहे. या वस्त्राला पापपुण्याचे, वासनांचे, इच्छांचे डाग न पडता ते निर्मळ ठेवता आले पाहिजे.



© www.madhaveeraghuveer.com

13 SAT FEB 2010

Wk 06, 044-321

Priority

February 2010

| M | T | W | T | F | S | S |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |

यो वा एतामेवं वेदापहत्य पाप्मानमनन्ते स्वर्गे लोके ज्येये प्रतितिष्ठति प्रतितिष्ठति ॥८॥

अन्वय - यः एताम् वै एवम् वेद सः पाप्मानं अपहत्य अनन्ते ज्येये स्वर्गे लोके प्रतितिष्ठति प्रतितिष्ठति॥

अर्थ - जो वर सांगितल्याप्रमाणे या ब्रह्मविद्येला जाणून घेतो. तो आपल्या सर्व पापांचा निरास करून अविनाशी सर्वश्रेष्ठ परमधामात प्रतिष्ठित होतो. निश्चितपणे प्रतिष्ठित होतो.

विवेचन - जो या वेदविद्येला अशा प्रकारे जाणतो, चांगल्या रीतीने जाणतो, अनुभवतो त्याला लाभ होतो. त्याची सर्व प्रकारची पापे नष्ट होतात. तो अनंत अशा श्रेष्ठ लोकात निश्चित स्थिर होतो.

ज्या शक्ती इंद्रिये आदि परमेश्वराने मला दिल्या आहेत त्यांचा मी प्रसाद म्हणून स्वीकार करणार आहे. देणारा तो, करण्याची शक्ती त्याची, जगन्नियंता तो आहे. मी निमित्त आहे, उपकरण आहे. मिळालेल्या शक्तींचा उपयोग त्याचा शोध घेण्यात करावा. त्यागाधिष्ठित जीवन मी जगावे.

असे जीवन मी जगलो तर सर्व लेप गळून पडतील. जोपर्यंत मी कर्ता आहे तोवर पापपुण्याचे लेप मला लागणार. माझे कर्तृत्व मी सोडून दिले, त्याला कर्ता मानला की हे लेप मला लागणार नाहीत. पापाच्या भाराने अधोगती मिळते तर पुण्याच्या भोगाने पुन्हा जन्म घ्यावा लागतो. हे दोन्ही मला नको. पापपुण्याचे लेप लागू न देणे हेच मानवी जीवनाचे ध्येय हवे.

Birthday / Anniversary

© www.madhavvaragrjweer.com